( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

**[२०२३]३ एस. सी. आर. ६७६ सुप्रीम कोर्ट रिपोर्ट्स**

**राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली सरकार आणि इतर**

**विरुद्ध**

**कमलेश राणी भटला**

**दिवाणी अपील क्रमांक १९२७/२०२३**

**२३ मार्च २०२३**

**[न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस आणि न्यायमूर्ती कृष्ण मुरारी.]**

केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२: नियम. २६(४) –राजीनामा दिल्यावर सेवा समपहरन -राजीनामा मागे घेणे- वस्तुस्थितीनुसार, उत्तरवादीने निवडणूक लढवण्यासाठी तिचा राजीनामा दिला, आणि राजीनामा स्वीकारण्यात आला – ती निवडणूक हरली आणि त्यानंतर, राजीनामा मागे घेण्यासाठी अर्ज केला – अर्ज प्रलंबित ठेवण्यात आला - त्यानंतर तिने रिट याचिका दाखल केली ज्यामध्ये उच्च न्यायालयाने अधिका-यांना विमर्शपूर्वक निर्णय घेण्याचे निर्देश दिले आणि त्यानंतर निर्मल वर्मा प्रकरणातील उच्च न्यायालयाच्या निकालाची दखल घेऊन तिचा राजीनामा मागे घेण्याची विनंतीवर निर्णय दिला - उत्तरवादीचे अभिवेदन अपीलकर्त्याने या आधारावर फेटाळले की ती ती कामावर असताना राजकीय कार्यात सहभागी असल्याबद्दल तिच्यावर आरोपपत्र दाखल करण्यात आले होते- उत्तरवादीने त्याविरूद्ध अर्ज केला - न्यायाधिकरणाने तिचा राजीनामा मागे घेण्यासाठी उत्तरवादीच्या प्रकरणावर निर्णय घेण्यासाठी

आणि तिला सहाय्यक शिक्षिका म्हणून कर्तव्यावर रुजू होण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकाऱ्यांना निर्देश देऊन परवानगी दिली - अपीलकर्त्याद्वारे रिट याचिका दाखल - उत्तरवादीविरुद्ध कोणतीही चौकशी करण्यात आली नाही आणि तिचा राजीनामा स्वीकारण्यापूर्वीच तिला दक्षता विषयक मंजुरीही देण्यात आली होती, असे मत उच्च न्यायालयाने अपीलवर व्यक्त करून ते फेटाळले-तो स्वीकारल्यानंतरही राजीनामा मागे घेण्यास परवानगी देण्यास नियोक्त्यावर कोणताही पूर्ण प्रतिबंध नाही – नियम २६ मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही –राजीनामा एकतर कायद्याच्या अटींनुसार किंवा त्याच्या स्वीकृतीद्वारे प्रभावी होऊ शकतो- सदर प्रकरणात, उच्च न्यायालयाचा पहिला आदेश नियोक्त्याला निर्मल वर्माच्या प्रकरणाच्या संदर्भात निर्णय घेण्याचे निर्देश होते ज्यामध्ये असे सूचित होते की तिच्या प्रतिकथन माघारीची दिलेल्या निकषांनुसार तपासणी करणे आवश्यक होते आणि नियोक्त्याने व्याप्तीदेणाऱ्या निर्देशांना कधीही आव्हान दिले नाही. त्या निकषांमध्ये उत्तरवादीचा विचार करण्याचा अधिकार स्पष्ट करण्यात आले होते– प्राधिकरण त्या निकषाच्या पलीकडे जाऊ शकले नाहीत आणि गेले नाहीत - अधिकाऱ्यांनी, नाकारण्याच्या क्रमाने, राजीनामा एकदा स्वीकारल्यानंतर मागे घेता येणार नाही, अशी भूमिका घेतली नाही –उत्तरवादीने राजीनामा देण्यास कोणतेही सक्तीचे कारण नव्हते या आधारावर अपीलकर्त्यांनी त्यांच्या नाकारण्याच्या आदेशाचे कारणही दिले नाही- दोन्ही मंचांनी असे मत व्यक्त केले की, उत्तरवादीचे प्रकरण निर्मल वर्माच्या प्रकरणाच्या निर्णय मूलाधारानुसार केवळ तिच्यावर दोषारोपांचे ज्ञापन जारी करण्याच्या आधारावर वेगळे करता येणार नाही- राजीनामा तो स्वीकारल्यानंतरच प्रभावी होऊ शकतो आणि नियम २६ चा उप-नियम (४) अशा परिस्थिती नमूद करतो ज्यामध्ये राजीनामा प्रभावी झाल्यानंतरही माघारी घेतला जाऊ शकतो - उत्तरवादीची राजीनामा मागे घेण्याची प्रतिकथन त्यामध्ये नमूद केलेल्या आधारांवर फेटाळण्यात आली होती- न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालयाला अपीलकर्त्यांचा

युक्तिवाद न टिकण्याजोगा वाटला - न्यायाधिकरणाच्या निर्णयाला कायम ठेवणारा उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयात कोणत्याही हस्तक्षेपाची गरज नाही .

**निर्मल वर्मा विरुद्ध एम. सी. डी. आणि इतर [दिल्ली उच्च न्यायालयाचा रिट याचिका (दिवाणी ) क्र. ३३०३/२००३ मधील निर्णय, दिनांक १८-0३-२००५.]; शिक्षण संचालनालय विरुद्ध मनीषा शर्मा [रिट याचिका (दिवाणी ) क्र. ८४९४/२०१५ मधील दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्णय दिनांक २८-११-२०१९ ]; हरियाणा राज्य आणि इतर विरुद्ध राम कुमार मान (१९९७) ३ एससीसी ३२१-संदर्भित.**

**निर्णय - विधी संदर्भ**

**[१९९७] २ एस. सी. आर. ३२९**

**भर देण्यात आला** **परिच्छेद ११**

**दिवाणी अपील न्यायधिकारक्षेत्र**

**दिवाणी अपील क्रमांक १९२७/२०२३**

**दिनांक ०९.१०.२०१९ रोजीच्या, रिट याचिका (दिवाणी ) क्रमांक १११८/२०१९ मध्ये नवी दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.**

**अपीलकर्त्यांसाठी अधिवक्ते:-**

कु. माधवी गोर्डी दिवाण, (ए. एस. जी.),

कु. नीला केदार गोखले,

व्ही. व्ही. व्ही. पट्टाभिरामन,

कु. निधी खन्ना,

गुरमीत सिंग मक्कर.

**उत्तरवादींसाठी अधिवक्ते:-**

एम. एस. सैनी,

जतिंदर पाल सिंग,

रीमा चावला.

**या न्यायालयाच्या न्यायनिर्णय न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस यांनी दिला .**

**विशेष अनुमती दिली**

२. अपीलकर्ते दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंड न्यायपीठाच्या निर्णयाच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करतात, जे उत्तरवादीला आपला राजीनामा मागे घेण्यास आणि तिला पुन्हा कर्तव्यावर रुजू होण्यास परवानगी देण्याच्या केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशाला कायम ठेवते. त्या प्रसंगी, उत्तरवादी दिल्ली सरकारच्या शिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या शाळेत सहाय्यक शिक्षक म्हणून काम करत होती, ज्या आमच्यासमोर अपीलकर्ते आहेत. दिल्ली महानगरपालिकेच्या नगरसेवक पदाच्या निवडणुकीत भाग घेण्याची इच्छा असल्याने उत्तरवादीने दिनांक २२ मार्च २०१२ रोजी राजीनामा दिला होता. तिच्या राजीनाम्याची विनंती अधिकाऱ्यांनी दिनांक २९ मार्चलाच स्वीकारली, जी दिनांक २२ मार्च २०१२ पासून लागू झाली. मात्र, त्याच वर्षी एप्रिल महिन्यात झालेल्या निवडणुकीत त्या पराभूत झाल्या. दिनांक २१ एप्रिल २०१२ रोजी त्यांनी आपला राजीनामा मागे घेण्यासाठी आणि संबंधित पदासाठी पुन्हा कर्तव्यावर रुजू होण्यासाठी अर्ज केला. तथापि, २०१३ आणि २०१४ या वर्षांत अनेक स्मरणपत्रे पाठवूनही हा अर्ज प्रलंबित ठेवण्यात आला.

३.	त्यानंतर प्रतिवादीने दिल्ली उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. याची रिट याचिका (दिवाणी ) क्रमांक १५२२/२०१४म्हणून नोंदणी झाली होती आणि सदर याचिका  दिनांक २० मार्च २०१४ रोजी खालील निर्देश आणि आदेशासह निकाली काढण्यात आलीः-

"६. तिच्या विनंतीवर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही या वस्तुस्थितीमुळे याचिकाकर्ते व्यथित आहेत. याचिकाकर्त्याने माहितीचा अधिकार कायदा, २००५ (आर. टी. आय. कायदा) चा देखील अवलंब केला आहे. आर. टी. आय. कायद्यांतर्गत केलेल्या अर्जाच्या संदर्भात, उत्तरवादी क्र. १ आणि २ कडून दिनांक  १८. ०१. २०१३ रोजी एक प्रत्युतर प्राप्त झाले आहे जे केवळ असे सूचित करते की तिच्या राजीनामा मागे घेण्याच्या विनंती संबंधी काय निर्णय आहे ?  प्रक्रियाधीन आहे .

७. वरील तथ्ये लक्षात घेता, माझ्या मते, उत्तरवादी या प्रकरणात निर्णय घेऊ शकत नाहीत. अशा प्रकारे रिट याचिका उत्तरवादीना या निर्देशासह निकाली काढली जाते की, त्यांनी याचिकाकर्त्याची राजीनामा मागे घेण्याच्या विनंतीवर विचारपूर्वक निर्णय घ्यावा आणि त्यानंतर ती निकाली काढावी. तथापि एक स्पष्ट आदेश (स्पीकिंग ऑर्डर). आवश्यक ती कार्यवाही त्वरीत केली जाईल मात्र आजपासून १० आठवड्या पेक्षा जास्त (आठवड्यानंतर) नाही. दिलेल्या आदेशाची प्रत याचिकाकर्त्याला दिली जाईल. आदेश पारित करताना, निर्मल वर्मा विरुद्ध एम. सी. डी. आणि इतर. या शीर्षकाखाली रिट याचिका (दिवाणी ) क्र. ३३०३/२००३ मध्ये पारित केलेल्या या न्यायालयाच्या दिनांकित १८.0३.२००५ च्या निर्णयाचीही नोंद उत्तरवादींनी घेतली .

८. रिट याचिका आणि अर्ज उपरोक्त निर्देशांसह निकाली काढली  जाते.  "

[पेपर बुकातून शब्द न शब्द  उद्धृत केले]

४.	दिनांक १४ मे २०१५ रोजी, शिक्षण उपसंचालक,  दक्षिण पूर्व जिल्हा, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली सरकारने तिची याचिका फेटाळली  आणि इतर गोष्टींबरोबरच आदेश दिला :-

".. आणि ज्याअर्थी, माननीय उच्च न्यायालय दिल्लीच्या रिट याचिका (दिवाणी )क्र. ३३०३/२००३ मधील दिनांकित १८.0३.२००५ न्यायनिर्णयाचा परिणामक भाग खालीलप्रमाणे पुन्हा सादर केला आहे; -

"....अशा प्रकारे असे दिसून येईल की, वर नमूद केलेल्या प्रकरणांमध्ये आणि दुर्गेश मोहनपूनूच्या प्रकरणातही जे की याचिकाकर्त्याच्या प्रकरणानंतर

प्रक्रिया करण्यात आलेले नवीनतम प्रकरण आहे, उत्तरवादींनी सातत्यपूर्ण भूमिका घेतली आहे की, राजीनामा स्वीकारल्यानंतर राजीनामा मागे घेण्याची परवानगी देणे त्यांना कायदेशीररित्या अनुज्ञेय आहे आणि त्यांनी सेवा पुनर्स्थापित करण्याच्या प्रथेचे पालन केले आहे. याचिकाकर्त्याच्या खटल्यातही याचिकाकर्त्याच्या खटल्याला विफल करण्यासाठी वेगळा निकष किंवा विरुद्ध कायदेशीर निवेदन स्वीकारण्यासाठी कोणताही आधार तयार केलेला नाही. याचिकाकर्त्याने तिचा राजीनामा स्वीकारल्यानंतर एका महिन्याच्या आत आणि ती निवडणूक हरल्यानंतर एका आठवड्याच्या आत केंद्रीय नागरी सेवा (सी. सी. एस.) निवृत्तिवेतन नियमांच्या नियम २६ (४) नुसार राजीनामा मागे घेण्याची परवानगी देण्याची विनंती केली होती. याचिकाकर्त्याचा अभिलेख चांगला नव्हता किंवा ती कोणत्याही गैरवर्तणुकीसाठी दोषी होती असे नाही: किंवा अनुचितपणा किंवा प्रामाणिकपणावर कोणत्याही संशयाचे प्रकरण इत्यादी हे उत्तरवादीचे प्रकरण नाही. याचिकाकर्त्याला सेवेत पुन्हा नियुक्त करण्यास नकार देणे आणि कोणत्याही विशिष्ट वैशिष्ट्याच्या अभावी याचिकाकर्त्याला इतरांप्रमाणेच वागणूक न देणे, उत्तरवादीची कार्यवाही मनमानी ठरते आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ अंतर्गत हमी दिल्याप्रमाणे समानता नाकारण्या समान आहे. या संदर्भात सेंगारा सिंह आणि इतर. विरुद्ध पंजाब राज्य आणि इतर चा संदर्भ घेतला जाऊ शकतो. सूचित केले गेले..."

आणि ज्यार्थी , श्रीमती कमलेश राणी भाटिया यांच्या प्रकरणाची निर्मल वर्मा प्रकरणा समान मानली जाऊ शकत नाही.

आता, त्यामुळे, या प्रकरणाच्या सर्व पैलूंचा विचार केल्यानंतर, श्रीमती कमलेश राणी भाटिया यांनी आपला राजीनामा मागे घेण्याची केलेली विनंती मान्य केली आहे आणि त्यात कोणतीही योग्यता आढळली नाही, म्हणून ती नाकारली जात आहे.

हे प्रकरण , सक्षम प्राधिकरणाच्या पूर्वपरवानगीसह आणि रिट याचिका (दिवाणी ) क्र. १५२२/२०१४. मध्ये मंजूर झालेल्या माननीय उच्च न्यायालयाच्या दिनांक २०.०३.२०१४ च्या आदेशाचे पालन करून पारित केले गेले .

[पेपर बुकातून शब्द न शब्द उद्‌धृत केले]

५. या आदेशाला उत्तर वादीने केंद्रीय प्रशासकीय टर्मिनल समक्ष आव्हान दिले होते.केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ च्या नियम २६(४) वर विसंबून न्यायाधिकरणाने दिनांक २० मार्च २०१७ रोजी दिलेल्या निर्णयात, दिनांक १८ मार्च २००५ रोजी रिट याचिका (दिवाणी) क्रमांक .३३०३/२००३ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या "निर्मल वर्मा-विरुद्ध-एम. सी. डी. आणि इतर ". या खटल्यातील निकालावर प्रामुख्याने विसंबून राहून उत्तरवादीचा खटला कायम ठेवला.

६. न्यायाधिकरणाच्या आदेशावरून आम्हाला असे आढळून आले आहे की, अपीलकर्त्याने त्यांच्या समक्ष दिलेला मुख्य युक्तिवाद असा होता की, निर्मल वर्मा (वर नमूद केलेले) यांचे प्रकरण या अर्थाने वेगळे करता येण्यासारखे होते की, त्या प्रकरणात अर्जदाराला कोणतेही आरोपपत्र देण्यात आले नव्हते, तर उत्तरवादीच्या बाबतीत केंद्रीय नागरी सेवा (वर्तणूक ) नियम, १९६४ च्या काही तरतुदींचे उल्लंघन केल्याचा आरोप करत आरोपपत्र सादर करण्यात आले होते. आरोपपत्र ४ सप्टेंबर २०११ रोजी जारी करण्यात आले आणि काम करताना तिच्या राजकीय कार्यात सहभागाशी संबंधित आरोपांचे दोन कलमे जारी करण्यात आली. निर्धारित शुल्का च्या परिशिष्ट ॥ मध्ये असे नमूद केले आहेः-

**परिशिष्ट ॥**

**श्रीमती कमलेश राणी बाटला, सहाय्यक शिक्षिकेच्या विरोधात दाखल आरोपांच्या कलमाच्या समर्थनार्थ गैरवर्तन /आचरण करण्याच्या आरोपांचे विवरण**

**अनुच्छेद ।**

श्रीमती. कमलेश राणी बाटला, सहाय्यक शिक्षिका सरकारी नोकरीत असताना. सर्वोदय कोएड. मिडल स्कूल, जे-ब्लॉक, संगम विहार, नवी दिल्ली, तिच्या कर्तव्यकाळात, बी. एस. पी., राष्ट्रीय राजकीय पक्षाद्वारे आयोजित बैठकीला विभागाला न कळवता किंवा परवानगी न घेता उपस्थित राहिली.

**अनुच्छेद II**

> श्रीमती. कमलेश राणी बाटला, सहाय्यक शिक्षिका, सर्वोदय कोएड.मिडी स्कूल, जे-ब्लॉक, संगम विहार, नवी दिल्ली च्या नोकरीत असताना आणि निवडणुकांच्या काळात बी. एस. पी. साठी प्रचार करत होत्या आणि घोषणा देत होत्या हे सी. डी. आणि छायाचित्रांच्या क्लिपिंगवरून स्पष्ट होते.
>
> अशा प्रकारे, त्यांनी केंद्रीय नागरी सेवा (सी. सी. एस.) (वर्तणूक) नियम, १९६४ च्या नियम ३ चे उल्लंघन केले आहे, जे सरकारी कर्मचाऱ्याला न साजेसे आहे."

[पेपर बुकातून शब्द न शब्द उद्धृत केले]

७. आम्ही आधीच सूचित केल्याप्रमाणे, न्यायाधिकरणासमोर अपीलकर्त्याने केवळ असा युक्तिवाद केला की उत्तरवादीला तिच्या राजीनाम्यापूर्वी आरोपपत्र जारी करण्यात आले होते. त्या आधारावर, अधिकाऱ्यांना निर्मल वर्माच्या (वरील) प्रकरणाशी संबंध तिच्या प्रकरणापासून वेगळा करायचा होता. न्यायाधिकरणाने खालील निरीक्षण नोंदवले आणि आणि अभिनिर्धारित केले :-

> "५. उत्तरवादींसाठी विद्वान वकिलांनी केलेला एकमेव युक्तिवाद असा आहे की अर्जदाराला तिच्या राजीनाम्यापूर्वी आरोपपत्र देण्यात आले होते आणि त्यानुसार अर्जदाराचे प्रकरण निर्मल वर्माच्या प्रकरणासारखे नाही ज्यावर त्याने भर दिला आहे, जर अर्जदाराला आरोपपत्र देण्यात आले असते तर तिचा राजीनामा स्वीकारणे हे उत्तरवादींच्या अधिकारक्षेत्रात होते आणि ते दक्षता मंजुरी (vigilance clearnace) जारी करू शकले नसते या साध्या कारणासाठी न्याय्य ठरत नाही. एकदा उत्तरवादींनी अर्जदाराच्या दक्षता संदर्भात मंजुरी दिली आणि तिला एम. सी. डी. ची निवडणूक लढवण्याची परवानगी दिली, म्हणून, माझ्या मते, उत्तरवादींना अर्जदाराच्या विरोधात आरोपपत्र प्रलंबित ठेवण्याची याचिका घेण्यास भाग पाडले जाते. माझे असेही मत आहे की उत्तरवादींनी त्यांच्या क्षमतेनुसार अर्जदाराचा राजीनामा चौकशी प्रलंबित असताना स्वीकारला नाही, न पेक्षा त्यांनी चौकशीत निर्णयाची प्रतीक्षा करायलाच हवी होती. त्यामुळे, या टप्प्यावर, आरोपपत्र प्रलंबित असल्याची वरील याचिका स्वीकारणे आणि सध्याच्या प्रकरणाचे स्वरूप निर्मल वर्माच्या प्रकरणाशी (वरील) वेगळे मानने हे अर्जदाराचा राजीनामा मागे घेण्याचा अर्ज नाकारण्याचा किंवा नाकारण्याचा त्यांचा अधिकार उत्तरवादींमध्ये निहित असल्याचे दिसून येते. केंद्रीय नागरी सेवा (सी. सी. एस.) (निवृत्तीवेतन) नियम,

१९७२ च्या नियम २६ अंतर्गत दिलेल्या सर्व अटी अर्जदाराने पूर्ण केल्या असल्याने, अर्जदाराला तिचा राजीनामा मागे घेण्यास नकार देण्याची उत्तरवादींची भूमिका या परिस्थितीत कायद्याच्या विरुद्ध असण्याव्यतिरिक्त वाजवी नाही.

६. निर्मल वर्माच्या खटल्यातील (वर नमूद केलेल्या) निकालावर विचार करताना मला असे आढळले आहे की दिल्लीच्या माननीय उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याच्या खटल्यात नियमांची स्थिती विचारात घेऊन अशाच प्रकारे अनुमती दिली आणि उत्तरवादींना त्यांचे राजीनामे मागे घेण्याच्या याचिकाकर्त्याच्या विनंतीवर कार्यवाई करण्याचे आणि त्यांना त्यांच्या कर्तव्यावर रुजू होण्यास अनुमती द्यावी असे निर्देश दिले. त्यामुळे, निर्मल वर्माच्या खटल्यात (वर नमूद केलेल्या) दिल्ली उच्च न्यायालयाने ठरवलेले निर्णय मूलाधार स्वीकारत, मी उत्तरवादींना अर्जदाराने तिचा राजीनामा मागे घेण्यासाठी आणि त्यांना सहाय्यक शिक्षक म्हणून कर्तव्यावर रुजू होण्यास परवानगी देण्यासाठी अर्जदाराच्या खटल्यावर कार्यवाही करण्याच्या निर्देशासह सदर मूळ अर्जाला ( ओ ए) परवानगी देतो आणि परिणामी लाभांसह विद्यमान नियमांनुसार मध्यंतरीचा कालावधी देखील ठरवला जावा. तथापि, प्रलंबित आरोपपत्र असल्यास, नियमांनुसार पुढे जाण्यास उत्तरवादींना स्वातंत्र्य आहे. आणि परिणामी लाभांसह विद्यमान नियमांनुसार मध्यंतरीचा कालावधी देखील ठरवला जावा. तथापि, प्रलंबित आरोपपत्र असल्यास, नियमांनुसार पुढे जाण्यास उत्तरवादींना स्वातंत्र्य आहे. खर्चा बाबत कोणताही आदेश नाही. "

[पेपर बुकातून शब्द न शब्द उद्‌धृत केले]

८. उत्तरवादीविरुद्ध कोणतीही चौकशी करण्यात आलेली नाही आणि तिचा राजीनामा स्वीकारण्यापूर्वी तिला दक्षता मंजुरीही देण्यात आली होती, असे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने आक्षेप घेतला आणि अपीलकर्त्या अधिकाऱ्यांनी दाखल केलेली रिट याचिका फेटाळली.

९. आमच्या समक्ष, अपीलकर्त्याच्या वतीने, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल, श्रीमती दिवाण यांनी दिनांक २८ नोव्हेंबर २०१९ रोजी निर्णीत रिट याचिका (दिवाणी ) क्र. ८४९४/२०१५ मध्ये शिक्षण संचालनालय-विरुद्ध-मनीषा शर्मा या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला दिला

आहे. उच्च न्यायालयाच्या खंड न्यायपीठाने या निकालात निर्मल वर्माच्या (वर नमूद केलेल्या) प्रकरणातील निर्णयाचा संदर्भ दिला होता आणि खालील निरीक्षण नोंदवले होतेः

> "१४. निर्मल वर्मा विरुद्ध एम. सी. डी. (वरील) मधील तर्कांशी न्यायालय सहमत होऊ शकत नाही, की उमेदवाराच्या बाजूने कोणताही गैरवर्तन झाले नसल्यामुळे, तिला आपला राजीनामा मागे घेण्याची परवानगी दिली जावी.निर्मल वर्मा विरुद्ध एम. सी. डी. (वरील) मध्ये जे लक्षात आले नाही ते म्हणजे राजीनाम्यावर आधीच कारवाई करण्यात आली होती आणि नियम २६ (४) कोणत्याही परिस्थितीत लागू झाला नाही."

१०. केंद्रीय नागरी सेवा सी. सी. एस. (निवृत्तीवेतन) नियम, १९७२ च्या नियम २६ मध्ये असे नमूद केले आहेः-

> २६. राजीनामा दिल्यावर सेवेचे समापहरण :-
>
> (१) नियुक्ती प्राधिकरणाने लोकहितासाठी ती मागे घेण्याची परवानगी दिली असल्याचे वगळता, तर एखाद्या सेवेतून किंवा पदावरून राजीनामा देणे म्हणजे पूर्व सेवेचे समापहरण करणे होय.
>
> २) सेवेसाठी पात्र असलेल्या सरकारच्या अखत्यारीत, तात्पुरती किंवा कायमस्वरूपी अशी दुसरी नियुक्ती घेण्यासाठी, योग्य परवानगी घेऊन, राजीनामा सादर केला गेल्यास, भूतकाळातील सेवेचे समापहरण केले जाऊ नये .
>
> (३) उप-नियम (२) अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही परिस्थितीत, वेगवेगळ्या स्थानकांवर दोन नियुक्त्या झाल्यामुळे सेवेतील व्यत्यय, जो बदलीच्या नियमांनुसार अनुज्ञेय असलेल्या रुजू होण्याच्या वेळेपेक्षा जास्त नसेल, सरकारी कर्मचाऱ्याला दिलासा देण्याच्या तारखेस कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करून किंवा ज्या मर्यादेपर्यंत तो कालावधी त्याच्या रजेखाली येत नाही त्या मर्यादेपर्यंत औपचारिक माफी देऊन समाविष्ट केला जाईल.
>
> (४) नियुक्ती प्राधिकरण एखाद्या व्यक्तीला लोकहितासाठी पुढील अटींवर राजीनामा मागे घेण्याची परवानगी देऊ शकेल, म्हणजेः
>
> i ) सरकारी कर्मचाऱ्याने काही सक्तीच्या कारणांमुळे राजीनामा दिला होता, ज्यामध्ये त्याच्या सचोटीवर, कार्यक्षमतेवर किंवा वर्तनावर कोणताही प्रभाव नव्हता आणि राजीनामा मागे घेण्याची विनंती परिस्थितीतील भौतिक बदलाचा परिणाम म्हणून केली गेली आहे, ज्यामुळे त्याला मूलतः राजीनामा देण्यास भाग पाडले गेले;

(ii ) ज्या तारखेपासून राजीनामा लागू झाला आणि ज्या तारखेपासून माघार घेण्याची विनंती करण्यात आली त्या तारखेच्या दरम्यानच्या कालावधीत संबंधित व्यक्तीचे वर्तन कोणत्याही प्रकारे अयोग्य नव्हते;

(iii ) ज्या तारखेला राजीनामा लागू झाला त्या तारखेपासून आणि ज्या तारखेस त्या व्यक्तीला राजीनामा मागे घेण्याची परवानगी मिळाल्यामुळे कर्तव्यावर पुन्हा रुजू होण्याची परवानगी दिली जाते त्या तारखेपर्यंतचा कर्तव्यातील अनुपस्थितीचा कालावधी नव्वद दिवसांपेक्षा जास्त नसावा;

(iv)सरकारी कर्मचाऱ्याने राजीनामा दिल्याने किंवा इतर कोणत्याही तुलनीय पदाच्या स्वीकृतीमुळे रिक्त झालेले पद उपलब्ध असेल "

५) जेथे सरकारी कर्मचारी एखाद्या खाजगी व्यावसायिक कंपनीमध्ये किंवा सरकारच्या पूर्ण मालकीच्या किंवा नियंत्रित कंपनीमध्ये किंवा सरकारद्वारे नियंत्रित किंवा वित्तपुरवठा केलेल्या संस्थेमध्ये किंवा त्याखाली नियुक्ती मिळविण्याच्या उद्देशाने त्याच्या सेवेचा किंवा पदाचा राजीनामा देतो त्या परिस्थितीत राजीनामा मागे घेण्याची नियुक्ती अधिकाऱ्याद्वारे केलेली विनंती विचारात घेतली जाणार नाही.

(६) नियुक्ती प्राधिकरणाने एखाद्या व्यक्तीला आपला राजीनामा मागे घेण्यास आणि कर्तव्यावर पुन्हा रुजू होण्यास परवानगी देणारा आदेश पारित केला असता, त्या आदेशात सेवेतील बाधा क्षमापन करणे समाविष्ट असल्याचे मानले जाईल परंतु बाध्यतेचा कालावधी पात्रता सेवा म्हणून गणला जाणार नाही.

(७) नियम ३७ च्या उद्देशाने सादर केलेल्या राजीनाम्याचा अर्थ सरकारमधील पूर्वीची सेवा जप्त करणे असा होणार नाही. "

११. मनीषा शर्माच्या (उपरोक्त) प्रकरणात, खंड न्यायपीठाने असे मत व्यक्त केले की अशा परिस्थितीत कोणताही प्रासंगिक बदल झालेला नाही ज्यामुळे सुरुवातीला उत्तरार्थीला त्यात राजीनामा देण्यास भाग पाडले गेले आणि उत्तरार्थीने स्वेच्छेने राजीनामा दिला कारण तिला निवडणूक लढवायची इच्छा होती. असेही अधिनिर्णित केले गेले आहे की, एकदा राजीनामा स्वीकारला गेला आणि त्यावर कार्यवाही झाल्यानंतर , पदधारण करणारी व्यक्ती असा युक्तिवाद करू शकत नाही की राजीनामा देण्यासाठी त्याच्यावर सक्ती केली गेली होती. एकदा राजीनाम्यावर कार्यवाही झाली की, एखाद्या व्यक्तीला असा राजीनामा मागे घेण्याची परवानगी

देण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता.या न्यायालयाने हरियाणा राज्य आणि इतरां विरुद्ध रामकुमार मान [(१९९७) ३ एस. सी. सी. ३२१] या प्रकरणात उपरोक्त मत मांडले होते.

१२. जोपर्यंत या प्रकरणाच्या तथ्यात्मक संदर्भाचा संबंध आहे, जसे की आपण वर वर्णन केले आहे, उच्च न्यायालयाचा पहिला आदेश हा नियोक्त्याला निर्णय घेण्याबाबतचा निर्देश होता.त्या वेळी, निर्मल वर्मा (उपरोक्त) या प्रकरणात निर्धारित केलेले निर्णयमूलाधार कायम होते आणि उच्च न्यायालयाने प्राधिकार्यांना आमच्या समक्ष प्रतिवादीच्या याचिकेवर विचार करताना उक्त प्रमाणानुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते.अपीलकर्त्याने तो निर्णय स्वीकारला होता आणि मनाई हुकुमा बाबतचा निर्णय २० मार्च २०१४ मधील परीत आदेशामध्ये उच्च न्यायालया द्वारे निर्धारित निकषांतर्गत घेतला गेला होता राजीनामा मागे घेण्याची प्रतिवादीची विनंती फेटाळण्यात आल्याचे एकमेव कारण म्हणजे तिच्याविरुद्ध आरोपांचे ज्ञापन जारी करण्यात आले. प्राधिकाऱ्यानी फेटाळण्याबाबतच्या आदेशात, एकदा राजीनामा स्वीकारल्यानंतर तो मागे घेता येणार नाही, अशी भूमिका घेतली नाही. दोन फेऱ्यांचे खटले चाललेल्या या प्रकरणाच्या कुठल्याही टप्प्यावर, प्राधिकाऱ्यानी मनीषा शर्माच्या (उपरोक्त) प्रकरणातील निकालाचा आधार असलेला मुद्दा उपस्थित केला नव्हता.उत्तरार्थीने या आधारावर आपल्या मनाई हुकुमाचे कारण दिले नाही की , उत्तरार्थीस आपला राजीनामा देण्यास कोणतेही ठोस कारण नव्हते. कार्यवाहीच्या दुसऱ्या फेरीत ज्याद्वारे प्रस्तुत अपील उद्भवते, न्यायाधिकरणाला राजीनामा मागे घेण्याची उत्तरार्थीची याचिका फेटाळणे समर्थन स्वीकार्य असल्याचे आढळले नाही. आम्ही या न्यायनिर्णयात प्रथमतः उत्तरार्थीचे प्रकरण कायम ठेवण्यासाठी न्यायाधिकरणाने दिलेला युक्तिवाद पुनः प्रस्तूत केला आहे.न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालया समक्षही हा वाद उत्तरार्थी विरुद्ध ज्ञापन जारी करण्यापुरता मर्यादित राहिला.दोन्ही मंचांनी असे मत व्यक्त केले

की उत्तरार्थीच्या प्रकरणास  केवळ तिच्या विरुद्ध आरोप ज्ञापन जारी करण्याच्या शक्तीच्या आधारावर  निर्मल वर्मा (उपरोक्त) प्रकरणातील  प्रमाणापासून वेगळे केले जाऊ शकत नाही.

१३.  उच्च न्यायालयाने न्यायाधिकरणाचा प्रतिवादींच्या बाजूने गेलेला निकाल कायम ठेवल्यानंतर, २८ नोव्हेंबर २०१९ रोजी मनीषा शर्मा (उपरोक्त) प्रकरणातील खंड न्यायपीठाचा निकाल देण्यात आला. या निर्णयात, खंड न्यायपीठाने, नियम २६(४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अटींचे विश्लेषण करताना असे आढळून आले की, निवडणूक लढवण्यासाठी राजीनामा दिल्यानंतर, त्यातील उत्तरार्थीला असे निवेदन करण्याचा अधिकार नाही की  तिच्यावर सक्ती करण्यात आली  होती असेही निवेदन करण्यात आले आहे की, एकदा राजीनामा स्वीकारला गेला आणि त्यावर कार्यवाही झाली की, एखाद्या व्यक्तीला असा राजीनामा मागे घेण्याची परवानगी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तथापि, प्रस्तूत प्रकरणातील तथ्यांमध्ये, उत्तरार्थीची माघार घेण्याची विनंती फेटाळण्यासाठी त्या कारणाचा वापर केला गेला नाही.या व्यतिरिक्त , ज्या निकषांच्या आधारे प्राधिकार्यांना राजीनामा मागे घेण्याच्या विनंतीवर निर्णय घेण्यास सांगण्यात आले होते, ते स्वतः उच्च न्यायालयाने निश्चित केले होते.ज्या कक्षेच्या आत प्राधिकऱ्यानी पदधारकाच्या याचिकेची तपासणी करायची होती, त्यावर अधिकाऱ्यांनी कोणत्याही मंचासमोर प्रश्न उपस्थित केले नाहीत.दुसरीकडे, त्यांनी उक्त मापदंडाचा स्वीकार केला आणि उच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या सीमारेषेमध्ये त्यांचा विचार मर्यादित करून याचिका फेटाळून लावण्यात आली .

१४.  आमच्या मते, या प्रकरणाच्या संदर्भात, मनीषा शर्माच (उपरोक्त) मधील प्रमाण लागू केले जाऊ शकत नाही.या न्यायनिर्णयात खंडन्यायपीठाने नियम २६(४) मध्ये दिलेला अर्थ कायद्याचा प्रस्ताव म्हणून आम्ही स्वीकारतो.परंतु येथे उत्तरार्थीच्या बाबतीत, तिच्या प्रतीकथन

याचिकेची तपासणी ही दिलेल्या निकषांनुसार करणे आवश्यक होते आणि नियोक्त्याने प्रतिवादीच्या प्रतीकथन याचिकेवर विचार करण्याची व्याप्ती ठरवणाऱ्या निर्देशाला कधीही आव्हान दिले नसल्यामुळे, त्या निकषांनुसार विचार करण्याचा उत्तरार्थीचा अधिकार स्पष्ट झाला होता. प्राधिकारी त्या निकषाच्या पलीकडे जाऊ शकले नाहीत आणि गेलेही नाहीत.

१५. आता प्रश्न हा उद्भवतो की, उच्च न्यायालयाने नंतरच्या काळात दिलेल्या नियम २६ (४) च्या व्याख्येच्या आधारे आपण नियोक्त्याच्या निर्णयात अतिरिक्त कारणमीमांसा आणु शकतो का? सरतेशेवटी, प्रस्तूत अपीलमध्ये आपण एक नियोक्ताचा निर्णय घेत आहोत जो मनाई हुकूमातील काही विशिष्ट कारणांच्या आधारावर मालक-सेवक संबंध संपुष्टात आणला जातो. ही वस्तुस्थिती आहे की, उत्तरार्थीच्या बाबतीत नियम २६(४) लागू होतो आणि जेव्हा आम्हाला असे आढळले की उच्च न्यायालयाचा पहिला निर्णय या नियमांच्या तरतुदींच्या अगदी विरुद्ध होता, तेव्हा आम्ही मनीषा शर्मा (उपरोक्त ) प्रकरणात असलेल्या तर्कावर आधारित कु. दिवाण यांचा युक्तिवाद स्वीकारला असता.परंतु या तरतुदीनुसार, आम्हाला असे आढळले नाही की, राजीनामा स्वीकारल्यानंतरही राजीनामा मागे घेण्यास नियोक्त्यावर पूर्ण निर्बंध आहेत.उक्त नियम २६ मध्ये अशी कोणतीही तरतूद नाही. या व्यतिरिक्त , नियम २६ च्या उप-नियम (४) मध्ये अशा काही परिस्थितींची कल्पना केली आहे ज्यात राजीनामा दिल्या नंतरही राजीनामा मागे घेण्याची परवानगी दिली जाऊ शकते. नियम २६ (४) च्या उपखंड (ii ) आणि (iii ) मध्ये विचारात घेतलेल्या परिस्थिती ह्या ते लागू झाल्यानंतर राजीनामा मागे घेण्यास परवानगी देतात.राजीनामा एकतर कायद्याच्या अटींनुसार किंवा त्याचा स्वीकार करून प्रभावी होऊ शकतो.पूर्व स्थिती स्पष्ट करण्यासाठी, काही वैधानिक दस्तऐवजांमध्ये राजीनामा प्रभावी होण्यासाठी राजीनाम्याच्या तरतुदी समाविष्ट असू शकतात, जेव्हां राजीनामा दिल्यानंतर निश्चित वेळेमध्ये नियोकत्याद्वारे

कोणताही निर्णय घेतला जात नाही.इथे तशी परिस्थिती नाही.जिथपर्यंत प्रस्तूत प्रकरणाचा संबंध आहे , राजीनामा केवळ तो स्वीकारल्यावरच प्रभावी होऊ शकतो आणि नियम २६च्या उप-नियम (४) अशा परिस्थिती नमूद कातात ज्यामध्ये राजीनामा प्रभावी झाल्यानंतरही माघारी घेतला जाऊ शकतो. तथापि, हा प्रश्न येथे उद्भवत नाही कारण या निर्णयात आपण ज्याची तपासणी करत आहोत ती त्या आदेशाची वैधता आहे ज्याद्वारे उत्तरार्थीचा राजीनामा मागे घेण्याची याचिका आदेशातच नमूद केलेल्या कारणास्तव फेटाळण्यात आली होती.न्यायाधिकरण आणि उच्च न्यायालयाला अपीलकर्त्याचा युक्तिवाद टिकण्याजोगा वाटला नाही.

१६. या प्रकरणातील विलक्षण तथ्यांमध्ये, आमच्या मते न्यायाधिकरणाच्या निर्णयाला कायम ठेवणाऱ्या उच्च न्यायालयाच्या निकालात कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

१७. त्यानुसार प्रस्तूत याचिका फेटाळली जात आहे .सर्व संबंधित अर्ज निकाली काढले जातात.

१८. खर्चाबाबत कुठलाही आदेश नाही.

*****

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****